# बटाटे येतात कुठून?

लेखक: मिलिसेंट सेल्सम



चित्रे: बेन शेक्टर

# बटाटे येतात कुठून?

मराठी अनुवाद: सुशील मेन्सन




स्यूने आपल्या आईला बटाट्याची सालं काढताना पाहिले.

“आज रात्री तू बटाट्याचं काय बनवणार आहेस खायला?” तिने विचारले.

“मी बटाट्याचा काही नवा पदार्थ बनवणार नाहीये. मी बटाटे फक्त शिजवणार आहे, स्यू. माझ्याकडे एकही बटाटा शिल्लक नाहीये. तू विकत आणतेस का बटाटे?” आईने विचारले.






स्यू भाजीच्या दुकानात गेली. दुकानातील भाजी विक्रेत्याला तिने विचारले, “मला दोन पौंड बटाटे द्या, प्लीज?”
“हे घे,” भाजी विक्रेता म्हणाला.

“हे माझ्याकडचे शेवटचे उरलेले बटाटे होते. आता माझ्याकडे आणखी बटाटे नाहीत. ”
“मग आता तुम्ही बटाटे कुठून आणणार?” स्यूने विचारले.

“मला त्रास देऊ नकोस,” भाजी विक्रेता म्हणाला. “मी खूप कामात आहे.”

स्यू बटाटे घेऊन घरी पळाली.

काही वेळाने ती पुन्हा त्या दुकानात परतली. भाजी विक्रेता एका मोठ्या कागदावर काही लिहीत होता.






“हाय,” स्यू म्हणाली.

“तू परत आलीस?” तो म्हणाला.

“सांगा ना मला, तुम्ही बटाटे कुठून विकत आणता?” स्यूने विचारले.

“ठीकाय, सांगतो. जवळ ये. हे बघ. तुला *बटाटे* हा शब्द दिसतोय?” तो सांगू लागला.

“आता त्याच्या समोर मी पोत्यांची संख्या लिहितो, बघ. एवढ्या पोत्यांची उद्या गरज लागले मला.”

“किती पोत्यांची गरज लागेल?” स्यूने विचारले.

“दहा पोती. म्हणजे पाचशे पौंड बटाटे,” भाजी विक्रेता म्हणाला.



“म्हणजे, खूप खूप बटाटे,” स्यू म्हणाली.
“पण येतात कुठून ते?”

भाजी विक्रेता म्हणाला,
“गोदामातून. त्याच गोदामातून माझी भाजीसुद्धा येते.
आता मी त्यांना फोन करतो.”
भाजीविक्रेता फोनवरून भाजीची ऑर्डर देत असताना स्यू लक्षपूर्वक ऐकत होती.
भाजीविक्रेता म्हणत होता, “पाचशे पौंड.”
“बटाट्यांबद्दल बोलत असणार,” स्यूने ओळखले.
मग भाजीविक्रेत्याने फोन ठेवला.

स्यूने त्याला विचारले, “गोदामातून भाज्या केव्हा येणार?”

“उद्या सकाळी सात वाजता त्यांचा ट्रक येईल इथे. तू त्यावेळी झोपलेली असशील,” भाजी विक्रेता म्हणाला.

“नाही, नाही,” स्यू म्हणाली. “मी येईन बघायला.”

पुढल्या दिवशी सकाळी

स्यू सात वाजायच्या आधीच जागी झाली.

ती थेट भाजीच्या दुकानात गेली.




दुकानाबाहेर ट्रक उभा होता.

फुटपाथवर पोती आणि खोके पडले होते.

काही पोत्यांवर *बटाटे* असा शब्द
लिहिलेला असल्याचे स्यूला दिसले.
तेव्हाच, भाजीविक्रेता दुकानाबाहेर आला.
“अगं, परत आलीस तू!” तो म्हणाला.
“तुमचे बटाटे आलेयत बघा गोदामातून.
मी गोदाम बघायला जाऊ शकते?” स्यूने
विचारले.
भाजीविक्रेत्याने स्यूकडे बघितले.
“ठीकाय, जाऊ शकतोस. तुझ्या आईला
पत्र लिहायला सांग, गोदामवाल्यांना,” तो
म्हणाला.
“कुठे?” स्यूने विचारले.




“आत ये,” भाजीविक्रेता म्हणाला.
“मी तुला पत्ता देतो.”
स्यूने हा पत्ता तिच्या आईकडे
दिला.



“मला नाही वाटत, ते तुला एकटीला परवानगी देतील,” तिची आई म्हणाली.
“तुझा आख्खा वर्ग जात असेल तर मात्र देतील.”
त्या दिवशी शाळेत
स्यूने आपल्या शिक्षिकेला विचारले,
“आपण सगळे गोदामाला भेट द्यायला जाऊया का?”
“कोणतं गोदाम?” शिक्षिकेने विचारले.
“काल,” स्यू सांगू लागली,
“माझ्या आईला बटाटे हवे होते, म्हणून
मी दुकानात आणायला गेले.
भाजीविक्रेत्याने मला शेवटचे उरलेले दोन पौंड बटाटे दिले.

मग मी त्यांना विचारले की ते बटाटे कुठून आणणार.
ते म्हणाले की एक ट्रक गोदामातून बटाटे घेऊन दुकानात येतो.
आज सकाळी मी दुकानाच्या दारात ट्रक पाहिला.
मी बटाट्यांची पोती पाहिली.
आता मला गोदाम बघायचंय.
माझ्या आईने तुम्हाला विचारायला सांगितलं की आपल्या वर्गातले सगळे गोदाम बघायला जायचं का.
हा गोदामाचा पत्ता. जायचं का आपण?”






शिक्षिकेने वर्गातील मुलांना विचारले,
“ऐकलंत ना तुम्ही सर्वांनी. कुणाकुणाला
गोदामाला भेट द्यायला आवडेल?”
सगळ्या मुलांनी आपले हात वर केले. मग
स्यूच्या शिक्षिकेने गोदामाच्या व्यवस्थापकांना
पत्र लिहिले.

आठवडाभर काहीच घडले नाही.
मग एक पत्र आले.
त्यात लिहिले होते, “तुमचा वर्ग कोणत्याही
दिवशी अकरा ते बारा या वेळात आमचं
गोदाम पाहायला येऊ शकतो.”
त्यावर सही होती “*जे. ग्रीन.*”

पुढल्या सोमवारी, स्यूचा संपूर्ण वर्ग गोदामाला भेट द्यायला गेला.
तिथे श्री. ग्रीन यांची भेट झाली.
ट्रकमध्ये बटाटे आणि इतर भाज्या कसे भरतात, हे त्यांनी मुलांना दाखवले.
"हे ट्रक कुठे जातात?" एका मुलाने विचारले.
"मला माहितीय," स्यू म्हणाली.
"ते दुकानांमध्ये जातात."
"बरोबर बोललीस," श्री. ग्रीन म्हणाले.
"हे ट्रक भाज्या घेऊन शहरातल्या साऱ्या दुकानांमध्ये जातात."




मग श्री. ग्रीन यांनी सांगितले की रेल्वे, ट्रक आणि टेम्पो यांतून भाज्या गोदामात आणतात.

“काही टेम्पो आणि ट्रकमध्ये बटाट्यांची पोती आहेत बघा,” ते म्हणाले.

“पण हे बटाटे येतात कुठून?” स्यूने विचारले.

“शेतातून,” श्री. ग्रीन म्हणाले.


“मी या मुलांना बटाट्याचं शेत दाखवायला नेऊ शकते?” शिक्षिकेने विचारले.




“ठीक आहे,” श्री. ग्रीन म्हणाले.

“तुम्ही श्री. *बर्टिल्युस्सी* यांचे शेत बघायला जा. ते शहरापासून फार दूर नाही.”


पुढल्या दिवशी शाळेत,
शिक्षिकेने श्री. बर्टिल्युस्सी यांना पत्र लिहिले.
एका आठवड्याने,
शिक्षिका मुलांना म्हणाल्या,
“पुढल्या मंगळवारी आपण श्री. बर्टिल्युस्सी यांच्या बटाट्याच्या शेतात जाणार आहोत.”
मंगळवारी,
संपूर्ण वर्ग शेताकडे रवाना झाला. श्री. बर्टिल्युस्सी त्यांची वाटच पाहात होते.
शिक्षिका त्यांना म्हणाल्या,
“बटाटे कसे उगवतात, हे आम्हाला पाहायचंय.”



“बटाटे जमिनीखालीच उगवतात,”
श्री. बर्टिल्युस्सी म्हणाले.
“मी मे महिन्यात रोपं लावली
होती. आता जून महिना आहे.
बटाट्याची रोपं वाढायला सुरुवात
झालीय.”
“तुम्ही त्याचं बी रुजवता का?”
शिक्षिकेने विचारले.
“नाही,” श्री. बर्टिल्युस्सी म्हणाले.
“आम्ही छोटे बटाटे रुजवतो.
त्यांना *बीज बटाटे* म्हणतात.”



त्यांनी एक बीज बटाटा
खिशातून काढला.
त्याचे त्यांनी दोन तुकडे केले.
मग पुन्हा प्रत्येक तुकड्याचे
दोन तुकडे केले. आता
त्यांच्याकडे चार तुकडे झाले.




“आम्ही असे तुकडे रुजवतो.
प्रत्येक तुकड्यावर किमान एक
किंवा दोन डोळे असले पाहिजेत.
या डोळ्यांनाच कोंब फुटतात
आणि नवीने रोपं वाढू लागतात.”

“पण तुम्ही हे तुकडे रुजवता
कसे?”
एका मुलाने विचारले.
“तुम्ही चालता चालताच
तुकडे जमिनीवर टाकता
का?”

“अरे नाही,” श्री. बर्टिल्युस्सी म्हणाले.
“माझं शेत खूप मोठं आहे. माझ्याकडे एक यंत्र आहे. ते बटाट्याचे तुकडे रुजवतं.”
मग ते मुलांना यंत्र दाखवायला धान्याच्या कोठारात घेऊन गेले.
“हे यंत्र एकाच वेळी दोन ओळींमध्ये बटाटे रुजवतं.”
श्री. बर्टिल्युस्सी यांनी मुलांना यंत्राची दोन धारदार चाकं दाखवली.
“ही चाकं खोदकाम करतात,” त्यांनी माहीती पुरवली.



मग त्यांनी मुलांना यंत्राच्या मागे असलेल्या धातुच्या दोन रिकाम्या पेट्या दाखवल्या.
“या प्रत्येक पेटीच्या तळाला दातेरी चाक आहे. चाक फिरलं की त्याचे दात पेटीतले बटाटे उचलतात. मग फिरताफिरताच चाक हे बटाटे एक एक करून जमिनीवर टाकतात.
या यंत्राला ही आणखी दोन धारदार चाकं आहेत. ही चाकं बटाट्यांवर माती टाकतात,” ते म्हणाले.



“आता बटाट्यांची रोपं कशी दिसतात पाहायचंय?”
श्री. बर्टिल्युस्सींनी विचारले.
“या माझ्या मागोमाग.”



सगळी मुले श्री. बर्टिल्युस्सी यांच्यासोबत शेतात चालू लागली.
शेतात जिथे नजर जाईल तिथे हिरवी हिरवी रोपं दिसत होती.

रोपांवर पांढरी फूलं उगवली होती.
“मला तर फक्त रोपंच दिसतायत,” स्यू म्हणाली.
“बटाटे कुठायत?”

श्री. बर्टिल्युस्सी यांनी एक फावडा घेतला आणि एका रोपट्याच्या खाली खणू लागले. मग त्यांनी ते रोप मुळापासून वर काढले.

“चला, आता बटाटे शोधा,” ते म्हणाले.

सगळे शोधू लागले.

स्यूला बटाटे दिसले.

ते लहान होते,

पण बटाटेच होते.



बटाटे रोपट्याच्या अशा
भागांवर होते, ज्यांची वाढ
जमिनीच्या खाली होते.
“किती छोटे आहेत ते!” स्यू
म्हणाली.
“उन्हाळ्यात ते आणखी मोठे
झालेले असतील,” श्री.
बर्टिल्युस्सी म्हणाले.
“आम्ही रुजवलेले बीज
बटाटेसुद्धा दिसतील तुम्हाला.”





"बटाटे तयार झाल्यावर त्यांना खणून कोण काढतं?" एका मुलाने विचारले.
"सप्टेंबरमध्ये एक मोठं यंत्र त्यांना खणून वर काढतं," श्री. बर्टिल्युस्सी म्हणाले.

"आम्ही येऊ का, यंत्र बटाटे कसे खणून काढतात ते बघायला?" शिक्षिकेने विचारले.
"मी तेव्हा खूप कामात असेन," श्री. बर्टिल्युस्सी म्हणाले.
"पण तुम्ही येऊन बघायला हरकत नाही. केव्हा यायचं, ते मी कळवेन तुम्हाला."

घरी जाताजाता स्यूने शिक्षिकेला विचारले, “त्या बटाट्यांच्या तुकड्यांमधून नवी रोपं कशी उगवतात?”

“बर्टिल्युस्सी काकांनी तुम्हाला सांगितलं नाही का,” शिक्षिका म्हणाल्या.

“बटाट्यांच्या डोळ्यांवर कोंब असतात. ते वाढून त्यातून नवं रोप उगवतं. घरी पोहोचल्यावर तू आईसाठी जे बटाटे विकत घेतलेस ना, ते नीट बघ एकदा.”



घरी पोहोचल्यावर स्यू तडक स्वयंपाकघरात धावली.

तिने पिशवीतील बटाट्यांचे निरीक्षण केले.

“बघ, हा कोंब बटाटा न रुजवताच वाढतोय,” ती आईला म्हणाली. “तो बटाट्याच्या डोळ्यामधून बाहेर आलाय.”"



मग तिने आईला बटाट्याचे चार तुकडे करण्यास सांगितले.
“हे असे तुकडे,” ती म्हणाली, “शेतकरी रुजवतात मातीत.”
सप्टेंबर महिन्यात,
स्यू पुन्हा शाळेत गेली.
नेहमीच्या शिक्षिकेला पाहून तिला आनंद झाला.
वर्गातील मुलेही तीच होती.
स्यूने विचारले, “आपण बर्टिल्युस्सी काकांच्या शेतात कधी जायचं?”


“त्यांनी मला पत्र पाठवलंय. पुढल्या बुधवारी आपण त्यांच्या शेतात जाऊ शकतो,” शिक्षिका म्हणाली.

बुधवारी, संपूर्ण वर्ग पुन्हा शेतात गेला.

शेताच्या मध्यभागी एक मोठा ट्रक होता.

त्याच्या पुढे एक ट्रॅक्टर होता. तो एका विशाल यंत्राला खेचत होता.

एक मुलगा म्हणाला, “बटाट्याची रोपं मरून गेली वाटतं!”




“बरोबर,” शिक्षिका म्हणाल्या. “सगळे बटाटे तपकिरी रंगाचे आहेत आणि रोपं मरून गेलीयत असं वाटतं. रोपं अशी का दिसतायत, हे सांगाल का मुलांना तुम्ही?” त्यांनी श्री. बर्टिल्युस्सी यांना विचारले.

“खणून काढताना ही रोपं अशीच मृतवत दिसली पाहिजेत,” श्री. बर्टिल्युस्सी म्हणाले.

“जेव्हा वरची रोपं मरतात, तेव्हा आम्हाला कळतं की जमिनीखालचे बटाटे काढण्यासाठी तयार आहेत.”



“आता एका बाजूला व्हा.”
शिक्षिका आणि मुलं यंत्रापासून दूर गेली. श्री. बर्टिल्युस्सी यांनी विशाल यंत्र खेचणारा ट्रॅक्टर सुरू केला. त्यांच्या पत्नीने ट्रक सुरू केला. तो यंत्राच्या सोबत चालू लागला. त्या यंत्राने एकाचवेळी बटाट्यांच्या दोन ओळी खणल्या. बटाटे एका सरकत्या पट्ट्यावर चढू लागले. माती आणि मृत वेली खाली जमिनीवर पडू लागले.




पण बटाटे पट्ट्यावर सरकत राहिले. शेवटी ते ट्रकमध्ये पडू लागले.

काही वेळाने, श्री. बर्टिल्युस्सी यांनी ट्रक थांबवला.
ते ट्रॅक्टरमधून खाली उतरले.
“ये इथे,” ते स्यूला म्हणाले,
“आता एक रोप खणून काढ.”
स्यूने बटाट्याच्या रोपाच्या सभोवती खणले. श्री. बर्टिल्युस्सी यांनी तिला मदत केली.




त्यांचे काम पूर्ण झाले तेव्हा जमिनीवर दहा मोठे बटाटे पडले होते.

मागल्या वेळी, वसंत ऋतूत, वर्गातील
मुलांनी लहान लहान बटाटे पाहिले
होते.
आता ते चांगलेच मोठे झाले होते.
श्री. बर्टिल्युस्सी शिक्षिकेला म्हणाले,
“माझा ट्रक पूर्ण भरलाय. माझ्या
मागोमाग गोदामात या.”
“आणखी एक गोदाम!” स्यू म्हणाली.
श्री. बर्टिल्युस्सी ट्रकमध्ये बसले.
मुले बसमध्ये चढली.
ते एका मोठ्या इमारतीपाशी आले.
“मुलांना आत घेऊन जा,”
श्री. बर्टिल्युस्सी शिक्षिकेला म्हणाले.



ट्रकच्या लगत असलेल्या भिंतीमध्ये एक खुला दरवाजा होता. बटाटे या दरवाजातून पुढे जात एका सरकत्या पट्ट्यावर पडत होते.





नंतर बटाटे एका यंत्रात गेले. त्या यंत्राने त्यांना धुतले आणि सुकवले.

मग बटाटे दुसऱ्या एका सरकत्या पट्ट्यावर पडले. शेवटी ते मोठमोठ्या पोत्यांमध्ये पडू लागले.

“या पोत्यांचं काय करतात?” शिक्षिकेने विचारले.

पोत्याजवळ उभा असलेला माणूस म्हणाला,

“ते ट्रकवर चढवतात.”

“मला माहितीय, नंतर ते कुठे जातात ते,” स्यू म्हणाली.



“ते या गोदामातून दुसऱ्या गोदामात जाणार. मग दुसऱ्या एका ट्रकमधून ते दुकानात जातात. आता कळलं, दुकानात आणखी बटाटे कुठून येतात ते!”

समाप्त

